| | |
|---|
| नि.फौ.ख.क्र. २३०३/२०१९ |
| सरकार -वि- दुर्गाप्रसाद वगैरे |
| निशाणी क्र.१० |

**<u>दोषारोपपुर्वीचा पुरावा</u>**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | निरज विठ्ठलराव लोहकरे |
| **वय** | : | ५५ वर्ष |
| **धंदा** | : | औषध निरीक्षक (अन्न व औषध प्रशासन), नागपूर |
| **राहणार** | : | ३११, हनुमाननगर, नागपूर. |

**<u>सरकार पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती माधवी जुमळे यांचेमार्फत</u>**

मी, सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, नागपूर यांचे कार्यालयात औषध निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

२. दिनांक १४.०६.२०१९ रोजी, अन्न व औषध प्रशासन, नागपूर येथे ई मेल व्दारे मुंबई येथील अन्न व औषध प्रशासन कार्यालयातून तक्रार प्राप्त झाली. त्या तक्रारीनुसार गामा पोर्टलवरील (Grevances Against Misleading Advertisement www.gama.gov.in) या संकेतस्थळावर संजिवणी बुटी क्लिनीक/संजिवणी बुटी फॉर आर्थरायटीस या जाहीरीती विरुध्द तक्रार नोंदविण्यात आली होती. त्याची प्रत याकामी दाखल आहे. त्यास **आर्टीकल-ए** देण्यात येते. या जाहीरातीत नमुद केलेले आक्षेपार्ह बाब Sanjeevani Booti is patiented Ayurvedic Medicine it helps to cure the disease in an effective manner, which contravenes Section 3(d) and schedule listed at serial no. 43 (Rheumatism) and punishable under section 7 of Drugs & Magic Remedies (Objectionable Advertisement ) Act 1954.

३. सदर तक्रारी मध्ये 'हेड ऑफ मार्केटिंग व कम्युनीकेशन, संजिवणी बुटी क्लिनीक, शॉप न. एफ-१०, मरक्युरी हाईटस कॉम्प्लेक्स, नारी बस स्टॉप जवळ, नारी रोड, नागपुर असा पत्ता नमुद होता. त्या अनुषंगे मी दिनांक २१.०६.२०१९ रोजी या पत्त्यावर तपासणीसाठी भेट दिली. तपासणी वेळी पेढीत सौ. सपना

फाळके ह्या हजर होत्या. त्यांना मी, डीएमआर/एडीव्ही/एनव्हीएल/१६९/२०१९/२ दिनांक २१.०६.२०१९ ची नोटीस दिली व त्यांना नोटीसमध्ये नमुद अभिलेख्याची मागणी केली. त्या नोटीसची स्थळ प्रत आता मला दाखवली, ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते.

४. मे. मॉ. नर्मदा क्रिपा फार्मा, जबलपुर चे मालक आरोपी क्र.१ याने त्याचे पत्र दिनांक ०३.०७.२०१९ व्दारे कळविले की सदरचा पाठ हा त्यांचाच असुन, संकेतस्थळावर व लेबलवर नमुद मजकुर हा आक्षेपार्ह आहे ही बाब त्यांना माहीत नव्हती. तसेच मे. मॉ नर्मदा क्रिपा फार्मा, संजिवणी बुटी, जबलपुर या ठिकाणावर उत्पादनाचे काम हे त्याच्याच देखरेखी खाली होते. त्यास तक्रारीचा ई-मेल प्राप्त होताच त्याने सदर आक्षेपार्ह बाब संकेतस्थळावरून व लेबलवरून काढली असे कळविले. ते पत्र आता मला दाखवले, ते तेच असून त्यावर माझी स्वीकारली म्हणून सही आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते. आरोपी क्र.२ हा मे. मॉ नर्मदा क्रिपा फार्मा, जबलपुर, येथे उत्पादनाचे काम बघतो तर आरोपी क्र.३ हा मे. मॉ नर्मदा क्रिपा फार्मा, जबलपुर, येथे चाचणीचे काम बघतो.

५. आरोपी क्र.१ याने संबंधीत कागदपत्रांच्या छायांकीत प्रती मला दिल्या, त्या याकामी दाखल आहेत. त्यांना एकत्रीतरित्या **आर्टीकल-बी** देण्यात येते.

६. सदर पाठाचे उत्पादन करून व गामा पोर्टलच्या संकेतस्थळावर आक्षेपार्ह बाबींची जाहीरात करून Section 3(d) and schedule listed at serial no. 43 (Rheumatism) and punishable under section 7 of Drugs & Magic Remedies (Objectionable Advertisement ) Act 1954 चे उल्लंघन केले आहे व सामान्य जनतेची फसवणुक केली आहे. म्हणुन तिन्ही आरोपींना Drugs & Magic Remedies (Objectionable Advertisement ) Act 1954 अंर्तगत कठोर कारवाई करण्यात यावी.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. एन.एन. गिरीपुंजे यांचेमार्फत**

७. सदर प्रकरणांसबंधी मी आरोपींना पत्र दिले नाही, हे म्हणणे खरे आहे. पेढीतील हजर इसम सपना फाळके यांचे बयान मी घेतले नाही. त्यांनी विक्री केलेल्या कथीत औषधांची बिले मी प्राप्त केली नाहीत. आरोपी क्र.१ याने संकेतस्थळावरुन जाहीरात हटविल्याचे पत्रामध्ये नमूद केले आहे, हे म्हणणे खरे आहे. मी

जाणूनबूजून खोटा खटला दाखल केला आहे, हे म्हणणे खरे नाही. ज्या संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द झाली होती त्या संकेतस्थळाच्या सत्यतेची पडताळणी मी केली नाही.

**प्रश्न** - आक्षेपार्ह जाहीरातीचे लेबल मी जप्त केले नाही हे खरे आहे काय ?

**उत्तर** - पेढीमध्ये त्या जाहीरातीचे उत्पादीत औषध नव्हते.

८. आरोपी आक्षेपार्ह जाहीराती करुन औषधे उत्पादीत करीत नव्हते, हे म्हणणे खरे नाही. आरोपी क्र.२ व ३ हे जबाबदार असलेबाबत कागदपत्रे प्रकरणात दाखल केले नाहीत, हे म्हणणे खरे नाही. आरोपींच्या कंपनीमध्ये मी गेलो नाही. आरोपी क्र.२ व ३ चे बयान मी घेतले नाही. मी सांगतो तशी तक्रार कार्यालयात प्राप्त झाली नव्हती, हे म्हणणे खरे नाही. घटनेदिवशी मी पेढीची तपासणी करण्याचा मला अधिकार होता हे दाखवण्यासाठी कागदपत्रे प्रकरणात दाखल नाहीत, हे म्हणणे खरे नाही. मी घटनेदिवशी नागपूर येथे कार्यरत होतो याबददल कागदपत्रे प्रकरणात दाखल नाहीत, हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास संपला**
**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(यु.पी. कुलकर्णी)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,दिनांक
०६.१०.२०२३
नागपूर.